**कि फौ अर्ज क्र. ४४२/२०२२**

**सोनाली वि. मुख्याधिकारी**

## आदेश नि ०१ वर

०१ अर्जदार याने सदरचा अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अनुसार मुख्याधिकारी, नगर पंचायत केज, ता. केज, जि. बीड यांनी त्यांची मुले नामे १. सोनाली पि. राजेंद्र कसबे, २. पृथ्वीराज पि. राजेंद्र कसबे यांच्या जन्माच्या तारखेची नोंद घेण्याबाबत आदेश पारित करावे अशी विनंती केली आहे.

०२ अर्जदार याचे असे कथन आहे की, अर्जदाराची मुले नामे १. सोनाली पि. राजेंद्र कसबे, हिचा जन्म दिनांक १८.०४.२०१२ रोजी व २. पृथ्वीराज पि. राजेंद्र कसबे याचा जन्म दि २५.०५.२०१६ रोजी मौजे केज येथे झाला, परंतु जन्माची नोंद नगर पंचायत कार्यालय केज, ता. केज,जि. बीड येथे दप्तरी घेणे राहून गेले आहे. तरी नगर पंचायत कार्यालयास अर्जदाराच्या मुलांची जन्माची नोंद करुन घेण्याकरिता आवश्यक तो आदेश पारित करावा. हि विनंती केली आहे.

*By virtue of Sec. 13 (3) of Registration of Births and Deaths Act, 1969 Magistrate after verifying correctness of birth and death may direct concerned to take entry of birth or death of a particular person. By virtue of Sec. 13 (3) Magistrate is supposed to verify correctness about date of death or birth of a concerned and if it revealed to Magistrate that date of birth or death is correct then he may direct concerned to take entry of date of birth or date of death in said register.*

०३ अर्जदाराने तिच्या कथनाच्या पृष्टयर्थ त्यांच्या मुलांची विद्यार्थी प्रवेश निर्गम नोंदणी रजिस्टरची सत्यप्रत नि.क्र. ०९ व १० वर दाखल केली आहे. दाखल दस्तावरुन अर्जदारांच्या मुलांची जन्म तारीख त्याच्या कथनाप्रमाणे आहे असे दिसून येते. तसेच अर्जदाराने दि. १८.१०.२०२२ रोजीचा दैनिक संकेत मधील जाहीर प्रगटन नि.क्र. ०७ वर दखल केले आहे. सदर जाहीर प्रगटनावरुन कुणीही अर्जदाराच्या मुलांच्या जन्म तारखेबाबत आजपर्यंत आक्षेप घेतलेला नाही. सदरच्या जन्म तारीखा सत्य आहे हे सिध्द करण्याकरिता त्यांनी स्वतःचे शपथेवर प्रतिज्ञापत्र (नि ०८ ) वर दाखल केलेले आहे. उपरोक्त दस्त व प्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता अर्जदाराच्या कथनाप्रमाणे त्यांच्या मुलांची जन्म तारखांची नोंद घेण्यास नगर पंचायत कार्यालय केज यांना आदेशित करणे यथोचित होईल असे माझे मत झाले आहे.

०४ सारांश, नगर पंचायत कार्यालय केज यांनी अर्जदाराच्या मुले नामे १. सोनाली पि. राजेंद्र कसबे, २. पृथ्वीराज पि. राजेंद्र कसबे यांच्या जन्माची नोंद घेण्याकरिता नियमाप्रमाणे व आवश्यकता असल्यास विलंब शुल्क स्वीकारावे असे आदेशीत करणे न्यायोचित होईल. सबब पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

०१ अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२ मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, ता. केज,जि. बीड यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराची मुले नामे **१. सोनाली पि. राजेंद्र कसबे,** हिचा जन्म दिनांक १८.०४.२०१२ रोजी मौजे केज येथे व **२. पृथ्वीराज पि. राजेंद्र कसबे** याचा जन्म दिनांक २५.०५.२०१६ रोजी मौजे केज येथे झाला असल्याबाबत नोंद नगर पंचायत कार्यालय केज येथील जन्म व मृत्यू

सी.एन.आर.नं. एमएचबीआय १०००१९५६२०२२

दस्त नोंदणी पुस्तीकेत नियमाप्रमाणे व आवश्यकता असल्यास विलंब शुल्क आकारुन नोंदणीकृत करावी.

Digitally signed by KAPIL NIVRATTIRAO NIVDANGE
Date: 2022.12.15 17:45:54 +0530

दि १३.१२.२०२२

**(कपील नि. निवडंगे )**
४थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बीड.